**<u>ठळक बातम्या</u>**

- रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- महाराष्ट्र विधानसभेतून समाजवादी पार्टीचे अबु असीम आझमी निलंबित, तर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात महाविकास आघाडीचा अविश्वास प्रस्ताव

- सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारं ५०० रुपयांच मुद्रांक शुल्क माफ करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७४० अंकांची वाढ

**आणि**

- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात न्यूझीलंडचं दक्षिण आफ्रिकेपुढं विजयासाठी ३६३ धावांचं आव्हान

**<><><><><>**

रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. यंदाच्या अर्थसंकल्पाच्या परिप्रेक्ष्यात रोजगारविषयक बाबींविषयी आयोजित वेबिनारला ते संबोधित करत होते. यंदाच्या अर्थसंकल्पात या संकल्पनेचा प्रभाव दिसत आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प भारताच्या भविष्याची ब्लूप्रिंट आहे. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा आणि उद्योगांप्रमाणेच रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषालाही प्राधान्य दिलं आहे, असं मोदी म्हणाले.

क्षमतावाढ आणि प्रतिभेला प्रोत्साहन या दोन्ही बाबी देशाच्या प्रगतीची पायाभरणी करतात. त्यामुळे विकासाच्या पुढच्या टप्प्यात आपल्याला या क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक गरजेची असून त्यासाठी संबंधितांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. वांशिक साधनसामुग्रीचं जतन करण्यासाठी जीन बँक स्थापन करण्याविषयीही मोदी यांनी या वेबिनारमध्ये सांगितलं. प्रशासन, पायाभूत सुविधा आणि आर्थिक शाश्वततेवर लक्ष केंद्रित करून एक लाख कोटी रुपयांचा शहरी आव्हान निधी देण्याची घोषणा यावेळी प्रधानमंत्र्यांनी केली. रोजगार आणि नवोन्मेष क्षेत्रात गुंतवणूक हा चर्चासत्राचा विषय आहे.

**<><><><><>**

समाजवादी पार्टीचे आमदार अबु असीम आझमी यांना चालू अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित करण्यात आलं आहे. औरंगजेबाचं उदात्तीकरण केल्याबद्दल आझमी यांना निलंबित करावं असा प्रस्ताव संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडला. आझमी यांच्या वक्तव्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान झाला असल्याचा आरोप करत सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी घोषणा दिल्या. यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष सुरू केला..

अबू आझमी यांचं सदस्यत्व अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत रद्द करण्याचा प्रस्ताव सभागृहात मंजूर झाला.

विधान परिषदेतही अबू आझमी यांनी केलेल्या वक्तव्याच्या मुद्द्यावरुन गदारोळ झाला. कामकाज सुरू झाल्यावर काँग्रेसचे भाई जगताप यांनी हा मुद्दा उपस्थित केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आझमी, प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांच्या विरोधात कारवाईची मागणी केली.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात महाविकास आघाडीनं आज अविश्वास प्रस्ताव सादर केला. सभापती राम शिंदे यांच्याकडे हा प्रस्ताव देण्यात आला. शिवसेना पक्ष फुटीपूर्वी त्या उपसभापती झाल्या होत्या. सर्व आमदारांचा त्यांना पाठिंबा नसल्याचा दावा महाविकास आघाडीनं केला आहे.

**<><><><><>**

विधानसभेत आज राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा झाली. परभणी जिल्ह्यातला आंबेडकरी कार्यकर्ता सोमनाथ सूर्यवंशी याचा कोठडीत मृत्यू झाल्याप्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी यावेळी केली. तसंच जालना जिल्ह्यातील भोकरदन इथं बोऱ्हाडे नावाच्या युवकाला गरम सळईनं चटके दिल्याचं प्रकरण महाराष्ट्रासाठी दुर्दैवी आहे असं ते म्हणाले. यावर बोऱ्हाडे याला झालेल्या मारहाण प्रकरणी मकोका अंतर्गत कारवाई करावी असे निर्देश पोलीस अधीक्षकांना दिल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील, आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी या चर्चेत सहभागी होताना सरकारवर जोरदार टीका केली.

शेतकऱ्यांची कर्जमाफी सरकारनं करावी अशी मागणी भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केली.

**<><><><><>**

सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारं ५०० रुपयांचं मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारनं घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. या निर्णयाची अंमलबजावणी तातडीनं करण्याचे निर्देश महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रासह शासकीय कार्यालयात दाखल करायच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क यापुढे भरावं लागणार नाही. त्याऐवजी केवळ स्व-साक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्र दिली जातील.

**<><><><><>**

मेक्सिको आणि कॅनडावर लादलेले शुल्क कमी करण्याचे संकेत अमेरिकेनं दिल्यानं देशातल्या शेअर बाजारांनी आज जोरदार उसळी घेतली. सेन्सेक्स ७४० अंकांची तेजी नोंदवून ७३ हजार ७३० अंकांवर बंद झाला. निफ्टी २५५ अंकांची वाढ नोंदवून २२ हजार ३३७ अंकांवर स्थिरावला. छोट्या आणि मध्यम आकाराच्या कंपन्यांच्या समभागात आज मोठी तेजी झाली.

**<><><><><>**

आयसीसीच्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज लाहोर इथं सुरु असलेल्या उपांत्य सामन्यात, न्यूझीलंडनं दक्षिण आफ्रिकेपुढे विजयासाठी ३६३ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. निर्धारित ५० षटकात ६ गडी गमावून ३६२ धावा केल्या. रचिन रवींद्र, आणि केन विल्यमसन यांनी १७४ धावांची भागीदारी केली. रवींद्रनं १०८ तर विल्यमसननं १०२ धावा केल्या. डॅरिल मिचेल, आणि ग्लैन फिलिप्स यांनी प्रत्येकी ४९ धावांचं योगदान दिलं.

विजयासाठी मोठया लक्ष्याचा पाठलाग करताना, शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या १९ षटकात १ बाद १०६ धावा झाल्या.

**<><><><><>**

भारताचे दिग्गज टेबल टेनिसपटू ए. शरथ कमल यांनी या महिन्याच्या अखेरीस निवृत्ती जाहीर केली आहे. चेन्नईत २५ ते ३० मार्च दरम्यान होणाऱ्या डब्ल्यूटीटी स्टार कॉन्टेम्पर स्पर्धेत मित्र परिवारासमोर निवृत्ती घेणार असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यांच्या २२ वर्षांहून अधिक काळापासूनच्या कारकिर्दीत ७ राष्ट्रकुल सुवर्णपदके, २ ऐतिहासिक आशियाई क्रीडा कांस्यपदके आणि ५ ऑलिंपिक स्पर्धांचा समावेश आहे.

**<><><><><>**

चॅम्पियन्स करंडक स्पर्धेत भारतानं ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर क्रिकेट संघातला प्रमुख फलंदाज स्टीव्ह स्मिथ यानं आज एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. कसोटी आणि टी-२० क्रिकेट प्रकारात आपण खेळणार असल्याचं स्मिथ यानं सांगितलं.

स्मिथनं १७० एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचं प्रतिनिधित्व करत ५ हजार ८०० धावा केल्या आहेत. यामध्ये १२ शतकं आणि ३५ अर्धशतकांचा समावेश आहे. एकदिवसीय प्रकारात स्मिथच्या नावावर २८ बळींची नोंद आहे.

**<><><><><>**

पशुधन आरोग्य आणि रोगनियंत्रण कार्यक्रमाच्या सुधारित स्वरुपाला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्ली इथं झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली.

पर्वतमाला प्रकल्पाअंतर्गत उत्तराखंडमधे सोनप्रयाग ते केदारनाथ या मार्गावर सुमारे १३ किलोमीटर लांबीचा रोपवे बांधण्याच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने आज मंजुरी दिली. या रोप वे मुळे ८ ते ९ तासांचा प्रवास ३६ मिनिटांवर येणार आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी गेल्या दोन दिवसांत ब्रिटनचे परराष्ट्र मंत्री डेव्हिड लॅमी यांच्याशी इंग्लंडमधल्या चेव्हनिंग हाऊस इथं विविध विषयांवर सकारात्मक चर्चा केली. भारत आणि ब्रिटन यांच्यातला धोरणात्मक समन्वय, राजकीय सहकार्य, व्यापार करार, शिक्षण, तंत्रज्ञान आणि नागरिकांमधले परस्परसंबंध यासह द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा झाल्याची माहिती जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली.

**//<><><><><>//**